# मिरा-भाईंदर,वसई- विरार आयुक्तालय

विषय :- दिनांक- **१५/०२/२०२३** रोजीचे पेपर कात्रणाबाबत.

१) गुन्हेगारी घटना २) कायदा व सुव्यवस्था ३) राजकीय घटना ४) इतर

| अ. क्र. | दिनांक | वर्तमान पत्राचे नांव | बातमीचा मथळा **(Heading)** | संबंधीत पो.ठाणे | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | १५.०२.२०२३ | पुण्यनगरी पु. पा .०४ | वसईत पाण्यासाठी बविआ आक्रमक पवित्र्यात | वसई-विरार | |
| २. | १५.०२.२०२३ | पुण्यनगरी पु. पा .०१ | मुलगी दत्तक देण्याचे नावाखाली खंडणी मागणारे गजाआड | नवघर | |
| ३. | १५.०२.२०२३ | पुढारी पु. पा.०३ | विरारमध्ये भेसळयुक्त बनावट निरीनिर्मीती कारखाना उद्‌ध्वस्त | मांडवी | |
| ४. | १५.०२.२०२३ | लोकमत पु. पा .०१ | मित्राकडूनच महिलेला आठ लाखांचा गंडा | नवघर | |
| ५. | १५.०२.२०२३ | पुढारी पु. पा .०१ | घोडबंदरचे सेवा रस्ते मुख्य रस्श्संमध्ये समाविष्ट होणार | इतर | |
| ६. | १५.०२.२०२३ | सकाळ पु. पा .०३ | स्वच्छतागृहाअभावी गैरसोय | वालीव | |
| ७. | १५.०२.२०२३ | सकाळ पु. पा .०१ | "विरार रन"मधून मानसिक स्वास्थ्याचा देणार संदेश | वसई-विरार | |
| ८. | १५.०२.२०२३ | सामना पा. नं .०३ | बढतया-बदल्यांचा खेळखंडोबा., पोलिसांमध्ये प्रचंड अस्वस्थता | राज्य | |
| ९. | १५.०२.२०२३ | लोकसत्ता पु. पा .०१ | गटाराचा स्लॅब कोसळून टेम्पो चालकाचा मृत्यू | वालीव | |
| १०. | १५.०२.२०२३ | सकाळ पा. नं .०५ | लिव्ह-इन रिलेशनशिपमधील महिलेची नालासोपा-यात हत्या | तुळींज | |

पुण्यनगरी ५-५-२०

# वसईत पाण्यासाठी बविआ आक्रमक पवित्र्यात

## पाणीपुरवठा सुरळीत न झाल्यास आंदोलन छेडणार

**वसई :** वसई-विरार महापालिकेच्या प्रशासकीय काळापासून विरार-मनवेल पाडा परिसरात होत असलेला अनियमित व अपुरा पाणी पुरवठा सुरळीत करण्यात यावा, या मागणीसाठी बहुजन विकास आघाडी प्रथमच आक्रमक झाली आहे. ही समस्या लवकरात लवकर निकाली न निघाल्यास बहुजन विकास आघाडीच्या माध्यमातून उग्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा बविआ शिष्टमंडळाने दिला आहे.

बहुजन विकास आघाडीचे संघटक सचिव अजीव पाटील, माजी स्थायी समिती सभापती जितू भाई शहा, माजी सभापती पंकज ठाकूर, माजी नगरसेवक महेश पाटील, माजी स्थायी समिती सभापती प्रशांत राऊत यांच्या नेतृत्वाखालील या शिष्टमंडळात अन्य माजी नगरसेविका मीनल पाटील, चिरायू चौधरी, संगीता भेरे, हेमांगी पाटील व कार्यकर्ते किशोर भेरे, हरीश गोताड, प्रणव चौधरी, रमाकांत पाटील, स्वप्नील पाटील, जितू क्षत्रिय, हेमंत परेड आदींचा समावेश होता. या भेटीत या परिसरातील रहिवाशांची एक वर्षाची घरपट्टी माफ करण्याची मागणीही करण्यात आली.



वसई-विरार महापालिकेतील नगरसेवकांची मुदत २८ जून २०२० रोजी संपली होती. त्यानंतर लागलीच सुरू झालेला कोविड-१९ संक्रमण काळ व राज्यातील अन्य राजकीय घडामोडींमुळे वसई-विरार महापालिकेच्या निवडणुका लांबणीवर पडलेल्या आहेत. त्यामुळे वसई-विरार महापालिकेवर प्रशासक म्हणून आयुक्तांची नियुक्ती करण्यात आली आहे. परंतु वसई-विरार महापालिकेच्या प्रशासकीय राजवटीत नागरी सुविधांचा प्रचंड बोजवारा उडाला आहे. सामान्य नागरिकांना आवश्यक सोयीसुविधा मिळताना अडचणी येत आहेत. विरार-मनवेलपाडासारख्या भागात मागील एक वर्षात पाण्यासारखी अत्यावश्यक गरज पूर्ण होत नाही. सातत्याने अपुरा व अनियमित पाणीपुरवठा होत असल्याने नागरिक संतापले आहेत. हीच समस्या घेऊन बहुजन विकास आघाडीच्या शिष्टमंडळाने मंगळवारी आयुक्त अनिलकुमार पवार यांची भेट घेतली व या परिसराला होणारा अपुरा व अनियमित पाणीपुरवठा सुरळीत करण्यात यावा. तसेच या रहिवाशांची एक वर्षाची पाणीपट्टीही माफ करण्यात यावी, अशी मागणी केली.

मनवेलपाडा विभागात गेली तीन वर्षे सातत्याने अपुरा व ३ ते ४ दिवसांआड अनियमित पाणीपुरवठा होत आहे. यामुळे विभागातील समस्त नागरिक, महिला वर्ग संतप्त झाला असून त्यांचा उद्रेक झाल्यास कठीण परिस्थिती निर्माण होऊ शकते. बहुजन विकास आघाडीच्या माध्यमातून याआधी पाणी समस्येवर प्रशासनासोबत पत्रव्यवहारही करण्यात आला आहे. अशी पत्रे मिळाली की काही काळ पाणीपुरवठा सुरळीत होतो. त्यानंतर पुन्हा परिस्थिती 'जैसे थे' होते. महानगरपालिका आयुक्तांनी अधिकाऱ्यांसोबत विचारविनिमय करून येत्या आठ दिवसांत पाणीप्रश्नाविषयी कायमस्वरूपी मार्ग निघेल, अशी ग्वाही दिली आहे. विशेष म्हणजे या मागणीची प्रत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालघर जिल्हा पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांनाही पाठवण्यात येणार आहे, अशी माहिती माजी सभापती प्रशांत राऊत यांनी दिली आहे.

पुण्यनगरी ५-५-१०

# मुलगी दत्तक देण्याच्या नावाखाली खंडणी मागणारे गजाआड

**मीरा रोड :** मीरा रोड परिसरातील दाम्पत्यास कागदपत्रांची पूर्तता न करता दोन लाख ७० हजार रुपये घेऊन मुलगी दत्तक दिली. त्यानंतर हे महाभाग या दाम्पत्यास वारंवार आणखी पैसे मागू लागले. त्यामुळे या दाम्पत्यान पोलिसात तक्रार केली असता पोलिसांनी खंडणी मागणाऱ्या आरोपींना अटक केली.

मीरा रोड पूर्व परिसरात राहणारे मनीष रामदेव शंकर यांना दोन मुले असून त्यांना व त्यांच्या पत्नीस मुलीची आवड असल्याने त्यांनी अल्पेश कच्छिया व त्याचे मित्र यश सोनी, मनीष चौधरी व रोहित सुतार यांना २ लाख ७० हजार रुपये देऊन नवजात मुलगी दत्तक घेतली होती; परंतु दत्तक घेतलेल्या मुलीच्या कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी वारंवार आणखी पैशांची मागणी ते करू लागले. हे मुलीचे पालक नसून आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी गुन्हा दाखल केला. गुन्हा दाखल होताच वरिष्ठांच्या मार्गदर्शनखाली नवघर पोलीस ठाण्यातील गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तपास करून आरोपी यश हितेश सोनी, अल्पेशकुमार कच्छीया यांना ताब्यात घेऊन विचारपूस केली असता अर्भक हे पूर्वी सोबत काम करत असलेल्या महिलेचे असल्याचे सांगितले. ती महिलादेखील या गुन्ह्यात सहभागी असल्याने तिलादेखील अटक करण्यात आली आहे. गुन्ह्यात महिलेसोबत इतर २ आरोपींना अटक केली आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास स.पो.नि. गणेश केकाण हे करत आहेत.

पुढारी ५-५-२०

# विरारमध्ये भेसळयुक्त बनावट निरानिर्मिती कारखाना उद्ध्वस्त

## २ लाख ७३ हजारांचा मुद्देमाल केला हस्तगत



**मनोर : पुढारी वृत्तसेवा**

उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाने विरारच्या शहराच्या पूर्वेकडील खेरपाडा जाधव नगर रोड, कणेर फाट्यावर सोमवारी रात्री साडेनऊ वाजतच्या सुमारास केलेल्या कारवाईत बनावट नीरा निर्मितीचा कारखाना उद्ध्वस्त करण्यात आला आहे. छापा टाकून केलेल्या कारवाईमध्ये ६७५ लिटर भेसळयुक्त बनावट निरासाठा, नीरा पॅकिंगसाठी वापरले जाणारे प्लास्टिक पाऊच, मशीन आणि अन्य साहित्य जप्त करण्यात आले आहे. कारवाईत दोन लाख ७३ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

विरार पूर्वेकडील कणेर फाटा भागात भेसळयुक्त बनावट निरा निर्मिती सुरू असल्याची माहिती उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाला मिळाली होती. सोमवारी सायंकाळी भेसळयुक्त बनावट निरा निर्मिती सुरू असलेल्या ठिकाणी छापा टाकण्यात आला होता. उत्पादन शुल्क विभागाचे शासकीय वाहन पाहताच नीरा निर्मिती सुरू असलेल्या ठिकाणावरून तीन इसम पळून गेले.

भरारी पथकाने केलेल्या तपासात लक्ष्मण पंजाला, गणेश कन्ड्रा आणि विजय ऑरगॅन्टी नामक इसम भेसळयुक्त नीरा निर्मिती करीत असल्याची माहिती समोर आली आहे. कारवाई केलेल्या ठिकाणी आरोपींची कागदपत्रे मिळून आली. तिनही आरोपींना फरार घोषित करून त्यांचे विरोधात महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ चे कलम १५ ,६५ (ए)६६(उ )(ऊ)८३,९८,१०३ , तसेच भारतीय दंड संहिताचे कलम ३२८ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कारवाई नंतर भेसळयुक्त नीरा निर्मितीचे ठिकाण सीलबंद करण्यात आले आहे.

कारवाई उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक सुधाकर कदम, उप अधीक्षक बाबासाहेब भूतकर यांच्या मार्गदर्शनाखाली भरारी पथकाने ही कारवाई केली आहे.

---

लोकमत ५-५-२०

# मित्राकडूनच महिलेला आठ लाखांचा गंडा

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मुलांच्या शिक्षणासाठी पैशांची गरज असल्याने फेसबुकवर मैत्री झालेल्या व्यक्तीने मदतीच्या बहाण्याने महिलेस आठ लाखांना गंडा घातला. या प्रकरणी शुक्रवारी नवघर पोलिसांनी ४ जणांवर गुन्हा दाखल केला आहे.

भाईंदर पूर्वेच्या न्यू गोल्डन नेस्टमध्ये राहणाऱ्या अलका पाटील (५२) यांचे पती चंद्रकांत हे गेल्या वर्षी अभिनय विद्यामंदिरमधून शिक्षक म्हणून सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांना एक मुलगा व एक मुलगी आहे. मुलांच्या शिक्षणाकरिता जास्त पैसे खर्च होत असल्याने आर्थिक अडचण असल्याचे अलका यांनी त्यांची फेसबुकवर मैत्री झालेल्या अनोळखी डॉ. रायन रोलांड नावाच्या व्यक्तीस सांगितले. परदेशी क्रमांकावर व्हॉट्सअ‍ॅप चॅटिंगदरम्यान त्या फेसबुकच्या अनोळखी मित्राने आर्थिक मदत करतो, असे अलका यांना सांगितले.

पैसे पाठवण्यासाठी बँक खात्याची माहिती त्याने मागितली असता ती अलका यांनी दिली. त्याने बँक ऑफ लंडनमधून अलका यांच्या खात्यात ८० हजार पौंड ट्रान्सफर झाल्याचा फोटो व्हॉट्सअ‍ॅपवर पाठवला. त्यानंतर अलका यांना कॉल करून परदेशातून पैसे पाठवले असल्याने प्रोसेसिंग शुल्क म्हणून पैसे भरावे लागतील, असे सांगून अलका यांच्याकडून ऑनलाइन खात्यात तब्बल ८ लाख ९ हजार रुपये उकळले. ८० हजार पौंड मिळणार म्हणून अलका यांनीदेखील त्यांच्या बँक खात्यातील रक्कम तसेच त्यांचे सोन्याचे दागिने गहाण ठेवून अनोळखी फेसबुक मित्राने सांगितल्याप्रमाणे विविध खात्यात पैसे भरले.

### दोघांवर गुन्हा दाखल

तुम्ही परदेशातून बेकायदा पैसे ट्रान्सफर करत असल्याने पोलिसांना माहिती देऊ अन्यथा साडेसहा लाख रुपये द्या, असे अलका यांना धमकावण्यात आले. अखेर फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यावर १० फेब्रुवारीला अलका यांच्या फिर्यादीवरून नवघर पोलिसांनी डॉ. रायनसह मिसेस निर्मला श्रीवास्तवा व आणखी दोघा मोबाइल क्रमांक धारकांवर गुन्हा दाखल केला आहे.

पुढारी पु.पा.१०

# घोडबंदरचे सेवा रस्ते मुख्य रस्त्यांमध्ये समाविष्ट होणार

## वाहतूककोंडी सोडवण्यासाठी आमदार सरनाईक आणि आयुक्तांच्या बैठकीत निर्णय

**ठाणे : पुढारी वृत्तसेवा**

घोडबंदर भागात कापुरबावडी ते गायमुख पर्यंत असलेले दोनही बाजूचे सेवा रस्ते आता मुख्य हायवेत समाविष्ट केले जाणार आहेत. त्यामुळे येथील वाहतुककोंडी सुटण्यास मोठ्या प्रमाणात मदत होणार असल्याची माहिती ओवळा माजिवडा विधानसभा मतदार संघाचे आमदार प्रताप सरनाईक यांनी दिली. मंगळवारी त्यांनी ठाणे महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान घोडबंदर भागातील वाहतुक कोंडीसह इतर महत्वाच्या विषयांवर चर्चा झाली.

घोडबंदर भागातील वाहतुककोंडी सुटावी यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे सेवा रस्ते मुख्य रस्त्यात समाविष्ट करण्याबाबत पत्र व्यवहार करण्यात आला होता. त्यानुसार महापालिकेला देखील तसे अवगत करुन देण्यात आल्याची माहिती त्यांनी या बैठकीत दिली. त्यानुसार याची कार्यवाही सुरु असल्याची माहिती महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी दिली. सध्या घोडबंदर भागात मेट्रोचे काम सुरु आहे. त्यामुळे या भागात वाहतुककोंडी होतांना दिसत आहे. परंतु भविष्यातील कोंडी टाळण्यासाठी हा उपाय महत्वाचा मानला जात असल्याचे सरनाईक यांनी यावेळी स्पष्ट केले. तर भविष्यात देखील हे सेवा रस्ते आणखी मोठे करण्याबाबतही त्यानुसार उपाय योजना करता येणे शक्य होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

दुसरीकडे घोडबंदर भागात दोन ठिकाणी पादचारी पुलांचे काम प्रस्तावित करण्यात आले आहे. त्या पुलांना मान्यता मिळाल्याची माहिती पालिका अधिकाऱ्यांना दिली. त्यानुसार त्यांची कामे लवकरच सुरु होणार असल्याचा विश्वासही व्यक्त करण्यात आला. याशिवाय येथील अंतर्गत रस्त्यांची कामेही पूर्ण करण्याबाबत यावेळी चर्चा करण्यात आली. काही ठिकाणची कामे आजही अपूर्ण असल्याचे निदर्शनास आले. मात्र ती देखील पूर्ण केली जातील असे पालिकेने यावेळी स्पष्ट केले.

### सेवा रस्त्यांचा समावेश करणे कठीणच

**घोडबंदर सेवा रस्त्यांचा मुख्य रस्त्यांमध्ये समावेश करण्यासंदर्भात विचार करण्यात आला असला तरी, प्रत्यक्षात मात्र ही योजना कठीण असल्याचे बोलले जात आहे. घोडबंदरच्या दोन्ही बाजूला असलेल्या सेवा रस्त्यांवर शाळा तसेच अनेक गृहसंकुले आहेत. या सेवा रस्त्यांवर अनेक छोटी वाहनांची वर्दळ सुरु असते. तसेच पादचारी देखील सेवा रस्त्यांचा चालण्यासाठी मोठ्या प्रमाणात वापर करतात. विशेष म्हणजे काही ठिकाणी मेट्रोचे पिलर देखील आले असून याचे नियोजन कसे होणार याबाबत अद्याप स्पष्टता आलेली नाही. ठाणे महापालिकेच्या विकास आराखड्यात घोडबंदर येथील सेवा रस्त्यांचा समावेश करण्यात आलेला नाही. मात्र त्यानंतर वाहतूक विभागाचा अभिप्राय आणि इतर अनुषंगिक गोष्टी पूर्ण झाल्यानंतर चित्र स्पष्ट होणार असल्याची माहिती पालिका सूत्रांनी दिली आहे.**

### पार्किंग प्लाझाची निर्मिती केली जाणार

शहरातील वाहतूककोंडी सोडवण्याच्या दृष्टीकोनातून ज्या ज्या ठिकाणी जागा उपलब्ध असतील त्या ठिकाणी पार्किंग प्लाझा निर्माण करण्याच्या सूचनाही यावेळी आमदार प्रताप सरनाईक यांनी केल्या. शहरातील रस्ते रुंद झाले तरी पार्किंगला कुठेच जागा नसल्याने वाहन चालकांची कोंडी होते. यासाठी ठिकठिकाणी पाच मजल्यांचे पार्किंग प्लाझाची निर्मिती करण्याच्या सूचना यावेळी त्यांनी केल्या.

### टीडीआर वेळेत मिळत नाही - सरनाईकांचा आरोप

कन्स्ट्रक्शन टीडीआरच्या माध्यमातून विकासक विविध स्वरुपाची कामे करत असतो. मात्र त्या बदल्यात त्याला महापालिकेकडून वेळेत मिळत नसल्याचा आरोप सरनाईक यांनी केला. मी घोडबंदर भागात एका ठिकाणी रस्त्याचे काम पूर्ण करुन दिले आहे. परंतु दिड वर्ष उलटूनही त्याचा टीडीआर मिळाला नसल्याचे त्यांनी यावेळी निर्दशनास आणले. किमान दोन ते तीन महिन्यात तो मिळाल्यास उपयुक्त ठरेल, त्यानुसार यासाठी एका अधिकाऱ्याची नेमणुक करुन एक खिडकी योजना त्यासाठी तयार करावी अशी मागणी त्यांनी यावेळी केली. त्यानुसार महापालिका आयुक्त बांगर यांनी देखील एक खिडकी योजनेला ग्रीन सिग्नल दाखविला. तसेच केलेल्या कामांचे तत्काळ मेजरमेंट घेऊन टीडीआर उपलब्ध करुन देण्यात यावा अशा सुचनाही त्यांनी संबधीत अधिकाऱ्यांना केल्या.

सकाळ ५-५-२०

# स्वच्छतागृहाअभावी गैरसोय

## वसई पूर्वेकडील नागरिकांनी राबवली सह्यांची मोहीम

वसई, ता. १४ (बातमीदार) : वसई पूर्वेकडे जुने सार्वजनिक स्वच्छता गृह, शौचालय होते. मात्र हे स्वच्छतागृह सात महिन्यांपूर्वी पालिकेकडून तोडण्यात आले. त्यामुळे येथील नागरिकांची गैरसोय होत आहे. त्यामुळे परिसरात स्वच्छतागृह असावे, यासाठी असल्याने महिलांसह स्थानिकांनी सह्यांची मोहीम राबवली. यात महापालिकेने स्वच्छता गृह उभारावे, अशी मागणी केली जात आहे.

संभाजी नगर येथे राहणाऱ्या लोकांसाठी ३० वर्षांपूर्वी सार्वजनिक स्वच्छतागृह आणि शौचालय उभारण्यात आले होते. येथे १६ बाथरूमची व्यवस्था होती. मात्र पर्यायी व्यवस्था न करता हे स्वच्छतागृह तोडण्यात आले. यामुळे नागरिकांनी संताप व्यक्त केला. या परिसरातील नागरिकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी महापालिकेचे परिवहन सभापती भरत गुप्ता, माजी नगरसेवक मनोज राय यांनी नागरिकांची भेट घेत चर्चा केली. या वस्तीत हजारो नागरिक राहत असून याठिकाणी गेल्या सात महिन्यांपासून शौचालय नाही. त्यामुळे लहान मुले, महिला, ज्येष्ठ नागरिकांना गैरसोय होत असल्याचे येथील रहिवाशांचे म्हणणे आहे. परंतु याठिकाणी अस्वच्छता, अन्य घटना घडत असल्याने ही कारवाई केल्याचे म्हणणे पालिका प्रशासनाचे आहे.



वसई : शौचालयासाठी महिलांनी सह्यांची मोहीम राबवली.

> वसई पूर्वेकडील शौचालय पाडण्यात आले. याठिकाणी मोठ्या प्रमाणात अस्वच्छता पसरत होती. तसेच काही आक्षेपार्ह प्रकार तेथे सुरू असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून प्राप्त झाल्या. त्यामुळे हे स्वच्छतागृह तोडण्याचा निर्णय घेण्यात आला. जर स्वच्छता ठेवण्यासाठी कोणी जबाबदारी घेणारे पुढे आहे तर निर्णय घेऊ.
> - अनिलकुमार पवार, आयुक्त.

> स्थानिक नागरिकांनी आणि माजी नगरसेवक मनोज राय यांनी समस्येची माहिती कळविल्याने घटनास्थळी भेट दिली. या संबंधी महापालिकेचे आयुक्त यांची भेट घेऊन येथील नागरिकांना सुलभ शौचालयाची व्यवस्था करून द्यावी अशी मागणी करण्यात आली आहे.
> - भरत गुप्ता, परिवहन सभापती

> संभाजी नगर येथे असलेले स्वच्छतागृह पालिकेकडून तोडण्यात आल्याने येथील वस्तीतील नागरिकांना त्रास होत आहे. त्यामुळे पालिकेने नागरिकांची गैरसोय लक्षात घेऊन तोडगा काढावा.
> - मनोज राय, माजी नगरसेवक

# 'विरार रन'मधून मानसिक स्वास्थ्याचा देणार संदेश

## येत्या रविवारी रंगणार स्पर्धा

← सकाळ ५-५-१.

वसई, ता. १४ (बातमीदार) : वसई-विरार शहरात मोठ्या प्रमाणात राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय खेळाडू आहेत. येथील खेळाडूंसह नवोदितांना प्रोत्साहन देण्यासाठी व मानसिक स्वास्था यासह विविध समाजपयोगी संदेश देता यावे म्हणून विरार रन मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन येत्या रविवारी (ता. १९) करण्यात आल्याची माहिती माजी नगरसेवक व आयोजक हार्दिक राऊत व खेळाडू पट्टू ग्रीष्म पाटील यांनी दिली. या स्पर्धेत बक्षिसांसह प्रत्येक सहभागी स्पर्धकांना प्रमाण पत्र देण्यात येणार आहे.

विरार रनची माहिती देण्यासाठी अमेय क्लासिक क्लब येथे पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी माजी नगरसेवक हार्दिक राऊत, ग्रीष्मा पाटील, माजी सभापती सखाराम महाडिक, डॉ अरुण गोयल, प्रवीण क्षीरसागर आदी उपस्थित होते. या स्पर्धेतील १० किमीची दौड विरार पश्चिम अमेय क्लासिक क्लब येथून सुरुवात होणार असून विराट नगर, जकात नाका, म्हाडा वसाहत करत अमेल क्लासिक क्लब येथे त्याची सांगता होणार आहे. यावेळी एशियन युथ गेम्समध्ये तिसरे स्थान पटकवणारी आणि खेलो इंडियतील सुवर्ण पदक विजेती इशा जाधव खेळाडूंचे प्रोत्साहन देण्यासाठी उपस्थित राहणार आहे.

विरार रन १० ते १२, १४ ते १६ या वयोगटांसाठी असणार आहे. मुलींसाठी व मुलांसाठी वेग वेगळी दौड आयोजित करण्यात आली आहे. यात ३, १.५ किलोमीटर आणि १ किलोमीटरची दौड ही विना शुल्क ठेवण्यात आली आहे. विरार रनमधील फन रन मध्ये अमली पदार्थ सेवनास बंदी, ट्रान्सजेंडर कम्युनिटी, निसर्ग संरक्षण यासह विविध संदेश देण्यात येणार आहेत.

सामना पा.नं.३.

# बढत्या-बदल्यांचा खेळखंडोबा; पोलिसांमध्ये प्रचंड अस्वस्थता



## राज्य शासनाच्या भोंगळ कारभाराचा फटका

मुंबई, दि. १४ (प्रतिनिधी) – मिंधे सरकारच्या भोंगळ कारभाराचा पोलीस दलाला नाहक मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याचे चित्र आहे. सहाय्यक आयुक्तपदासाठी पात्र पोलीस निरीक्षकांच्या बढतीचे आदेशच गृह खाते काढत नसल्याने अधिकाऱ्यांमध्ये प्रचंड अस्वस्थता पसरली आहे. राज्य सरकारला आमच्याकडे लक्ष द्यायला वेळ मिळणार आहे की नाही, असा सवाल पोलीस अधिकारी विचारत आहेत.

मिंधे सरकारने आयपीएस अधिकाऱ्यांच्या बढत्या आणि बदल्यादेखील बराच काळ रखडवून ठेवल्या होत्या. मग रखडलेल्या त्या बढत्या आणि बदल्या सवडीनुसार जारी केल्या होत्या. आता एसीपी ते उपनिरीक्षक पदापर्यंतच्या बढत्या आणि बदल्यांचा प्रश्न गेल्या कित्येक दिवसांपासून रेंगाळत ठेवला आहे. राज्यातील पोलीस निरीक्षक हे एसीपीसाठी पात्र असतानाही गृह विभाग त्यांच्या बढत्यांचे आदेश काढत नाही. परिणामी आज होईल, उद्या होईल अशा आशेवर अधिकारी येणारा दिवस काढत आहेत. तर बऱ्याच पात्र निरीक्षकांवर गृह खात्याच्या वेळकाढू कारभारामुळे एसीपी न बनताच निवृत्त होण्याची वेळ आली असल्याचा संताप व्यक्त होत आहे.

### एसीपीचे आदेश निघत नसल्याने बाकीचे लटकले

उपनिरीक्षक हे सहाय्यक निरीक्षक, तर सहाय्यक निरीक्षक हे निरीक्षकपदी बढती मिळण्याच्या गेल्या कित्येक दिवसांपासून प्रतीक्षेत आहेत. आज नाही तर उद्या शासनाला जाग येईल आणि आमच्याकडे बघायला त्यांना वेळ मिळेल असेच अधिकारी म्हणत आहेत. जोपर्यंत एसीपीपदाच्या बढतीचे आदेश निघत नाही तोपर्यंत उर्वरित अधिकाऱ्यांना बढती मिळणार नसल्याने पोलीस दलातून प्रचंड रोष व्यक्त होत आहे.

### *२५० सहाय्यक निरीक्षकांची बढती लटकली*

*१०२ बॅचच्या अर्ध्याअधिक सहाय्यक निरीक्षकांना निरीक्षकपदी बढती मिळाली आहे, तर याच बॅचच्या २५० अधिकाऱ्यांची बढती लटकली आहे. दोन महिन्यांपूर्वी या अधिकाऱ्यांच्या बढतीला कोर्टाकडून स्टे देण्यात आला होता, मात्र तो स्टे नंतर उठविण्यात आला. त्याला दोन महिने झाले तरी निरीक्षकपदी त्यांना बढती देण्यात आलेली नाही. जोपर्यंत एसीपींच्या बढतीचे आदेश निघत नाही तोपर्यंत आमचा प्रश्न मार्गी लागणार नाही, असे ते अधिकारी सांगतात.*

### विनंत्या बदल्यांची बोंबाबोंब

राज्यातील अनेक अधिकाऱ्यांनी अन्यत्र बदलीसाठी विनंती अर्ज केले आहेत. त्या अधिकाऱ्यांचा विहित कालावधी पूर्ण झाला असल्याने ते बदलीसाठी पात्रदेखील आहेत, मात्र प्रशासनाला याकडे बघायला वेळच मिळत नसल्याने विनंती बदल्यादेखील रखडल्या असल्याने अधिकाऱ्यांमधून नाराजीचा सूर उमटत आहे.

### बदल्या होऊनही सोडेनात

विहित कालावधी पूर्ण झालेल्या असंख्य निरीक्षक, सहाय्यक निरीक्षक व उपनिरीक्षकांच्या डिसेंबर महिन्यात बदल्यांचे आदेश जारी झाले होते, पण काही मोजके अधिकारी वगळता उर्वरित अधिकाऱ्यांना बदलीच्या ठिकाणी सोडलेच जात नसल्याने संबंधित अधिकारी प्रचंड नाराज झाले आहेत. आता अंत पाहू नका आणि बदलीच्या ठिकाणी सोडा, अशी आर्जव ते करीत आहेत.

लोकसत्ता पु-पा ७.

# गटाराचा स्लॅब कोसळून टेम्पो चालकाचा मृत्यू

## गटार धोकादायक असल्याच्या इशाऱ्याकडे दुर्लक्ष

**लोकसत्ता वार्ताहर**

**वसई :** वसई पूर्वेच्या वालीव येथील धुमाळ नगर परिसरात गटारावर टाकण्यात आलेला स्लॅब धोकादायक असल्याचा इशारा नागरिकांनी दिला होता. मात्र पालिकेने त्याकडे दुर्लक्ष केले. नुकताच या गटाराचा स्लॅब कोसळून टेम्पो चालकाचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. साबुद्दीन शेख असे मृत्यू झालेल्या चालकाचे नाव आहे.



या भागात असलेल्या गटारावर असलेला स्लॅब हा धोकादायक बनला असल्याचा इशारा पालिकेला दिला होता. अजूनही शहरातील बहुतांश ठिकाणी गटारावर असलेले स्लॅब हे कमकुवत आहेत. अशी स्थिती असतानाही पालिकेकडून त्याची पाहणी करून दुरुस्ती केली जात नाही. त्यामुळे गटारात पडून अपघात घडणे कायम आहे.

वालीवच्या धुमाळ नगर परिसरातील घटना पालिका प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे घडली असल्याचा आरोप मनसेचे कार्यकर्ते देवीदास केंगार यांनी केला आहे. स्लॅबचे काम निकृष्ट दर्जाचे असल्याने आज नाहक बळी गेला आहे. त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित ठेकेदार व अभियंता यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी केंगार यांनी वालीव पोलिसांकडे पत्राद्वारे केली आहे.

### सर्वच स्लॅबची पाहणी आवश्यक

शहरात अधूनमधून गटारावरील स्लॅब कोसळण्याच्या घटना समोर येतात. अशा घटना रोखण्यासाठी पालिकेने शहरात गटारांवर टाकलेले स्लॅब व त्याची सद्यःस्थिती काय आहे हे समजून घेणे गरजेचे आहे. त्यासाठी सर्वच स्लॅबची पाहणी करून आवश्यक ठिकाणी दुरुस्ती करावी, अशी मागणी नागरिकांमधून करण्यात येत आहे.

सकाळ पा. नं. ५०

# लिव्ह-इन रिलेशनशिपमधील महिलेची नालासोपाऱ्यात हत्या

## आरोपीला पोलिसांनी ठोकल्या बेड्या

नालासोपारा, ता. १४ (बातमीदार) : लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्या व्यक्तीने पार्टनर महिलेची गळा दाबून हत्या केल्याची घटना नालासोपाऱ्यात उघडकीस आली. याप्रकरणी फरार झालेल्या आरोपीला रेल्वे पोलिसांच्या मदतीने २४ तासांत बेड्या ठोकण्यात तुळिंज पोलिसांना यश आले आहे.

गुजरात राजस्थान सीमेवरील नागदा रेल्वे स्थानकात १४ फेब्रुवारी रोजी पहाटेच्या सुमारास रेल्वे पोलिसांनी आरोपीला पकडून तुळिंज पोलिसांच्या ताब्यात दिले. याबाबत तुळिंज पोलिस ठाण्यात पुरावा नष्ट करून, हत्या केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हार्दिक शहा असे आरोपीचे नाव असून मेघा तोरबी (वय ३७) असे हत्या झालेल्या महिलेचे नाव आहे. नालासोपारा पूर्व, आचोळा रोडवरील सीता सदन या इमारतीमध्ये २० ते २५ दिवसांपासून हे जोडपे लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहत होते. आरोपी हा सुशिक्षित बेरोजगार आहे, तर मृत महिला नर्सचे काम करून दोघांचा खर्च भागवत होती. याच कारणावरून या दोघांत नेहमी वादविवाद होत असल्याने पार्टनर महिलेची गळा दाबून हत्या करण्यात आल्याचे पोलिस तपासात उघड झाले आहे. आरोपीने महिलेची गळा दाबून हत्या करत, मृतदेह बेडमध्ये ठेवला होता. त्यानंतर घरातील काही सामान विकून, त्याच पैशाने आरोपी फरार झाला होता. गेल्या सोमवारी घरातून दुर्गंधी येत असल्याने नागरिकांना याची माहिती पोलिसांना दिली होती. या वेळी पोलिसांनी महिलेचा मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदन केले असता गळा दाबून हत्या केल्याचे उघड झाले.

### लोकेशन ट्रेस करत अटक

या हत्येप्रकरणी तत्काळ पोलिसांनी मोबाईल लोकेशन आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे आरोपीला ट्रेस करत, रेल्वे पोलिसांच्या मदतीने नागदा रेल्वे स्थानकात ताब्यात घेतल्याची माहिती तुळिंजचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक शैलेंद्र नगरकर यांनी दिली.